व्यंकटेश महाविद्यालयात बँकिंग, फायनान्स आणि विमा विषयावर परिसंवाद

" बँकिंग फायनान्स आणि विमा क्षेत्रामध्ये आधुनिक प्रणालींचा वापर वाढल्यामुळे या क्षेत्रामध्ये नवनवीन रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. या विषयावर आधारित प्रमाणपत्र अभिमुखता कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जागृत करणे गरजेचे आहे." असे प्रतिपादन बँक ऑफ इंडियाचे निवृत्त मुख्य व्यवस्थापक श्री. लक्ष्मीकांत कट्टी यांनी केले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालयाद्वारे आयोजित एक दिवसीय परिसंवादामध्ये बोलत होते. बँकिंग क्षेत्रातील त्यांचा असणारा अनुभव व पारंपारिक बँकेकडून आधुनिक बँकांकडे बँकांचा होणारा प्रवास, संगणक व इंटरनेटचा वाढता वापर इत्यादींमुळे बँकिंग फायनान्स व विमा व्यवसायामध्ये गतिमानता आली असून नव-नवीन रोजगार संधी महाविद्यालयीन युवक व युवतींना उपलब्ध होत आहे. त्यामुळे पदवी शिक्षणासोबत इतर आवश्यक कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात केले पाहिजे. ती काळाची गरज बनली आहे तरच विद्यार्थी आजच्या स्पर्धेवर मात करू शकतो. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.ए. माने होते. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये बँकिंग, फायनान्स आणि विमा हे अर्थव्यवस्थेला मजबूत बनवणारे घटक असल्याने अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये मोलाची भूमिका या तिन्ही क्षेत्रांनी पार पाडली आहे. येणारा काळ हा डिजिटल क्रांतीचा असून या तिन्ही क्षेत्रांमध्ये चांगल्या करिअरच्या संधी निर्माण होत असून त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. बी. एन. कांबळे यांनी प्रास्ताविक केले तर सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापिका पी. पी. दाइंगडे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी सहाय्यक प्राध्यापक टी. एन. मुल्ला यांनी आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.


Today's agenda – First step towards a successful career!
• Your transition from "Learner to Earner"
• Your "State of Readiness" for the transition
• The "Demand-Supply Gap" in the talent market
• "Path to Success"
• "CPBFI" as a first step!
CPBFI
Lenovo
Shri Venkatesh Mahavidyalaya,